अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)कार्यालय
पुणे महानगरपालिका
जा.क्र. अति.मआ.(ज)/६४०३
दि. १२/०७/२०२१

विषय:- महानगरपालिकेतील अधिकारी सेवकांना अन्य विभागामध्ये पदोन्नती अथवा बदली होवून सुद्धा बढतीपूर्व पदाचे /बद्लीपूर्व खात्यातील पदाचे भत्ते सुरु असलेबाबत. .

महानगरपालिकेतील अधिकारी सेवकांना अन्य विभागामध्ये पदोन्नती अथवा बदली होवून सुद्धा बढतीपूर्व पदाचे /बद्लीपूर्व खात्यातील पदाचे भत्ते सुरु असलेबाबत आमचे निदर्शनास आले आहे.

वास्तविक पाहता सेवकाचे बढती अथवा बदली झालेनंतर केवळ मूळवेतन ,ग्रेड वेतन, महागाई भत्ता व घरभाडे याच बाबी बढती अथवा बदली पूर्व खात्याचे वेतन प्रमाणपत्रावर दर्शविणे आवश्यक आहे. तथापि सेवकाचे बढती अथवा बदली झालेनंतर सुद्धा त्यास बढती अथवा बदली पूर्व खात्यातील पदाचे भत्ते सुरु असल्याने महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होत आहे.

मुख्य लेखा व वित्त अधिकारी आणि माहिती व तंत्रज्ञान अधिकारी यांनी वेतनपत्रक संगणक प्रणालीमध्ये उपरोक्त प्रमाणे दुरुस्ती करावी तसेच मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी वेतनपत्रक विभागास सदरप्रमाणे जादा भत्ते आदा होणार नाहीत याबाबत खातरजमा करण्याच्या सूचना द्याव्यात.

महानगरपालिकेतील ज्या अधिकारी सेवकांना अन्य विभागामध्ये पदोन्नती अथवा बदली होवून सुद्धा बढतीपूर्व पदाचे /बद्लीपूर्व खात्यातील पदाचे भत्ते सुरु असल्यास तात्काळ वसुली करून त्याबाबतचा अहवाल मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी आणि माहिती व तंत्रज्ञान अधिकारी यांनी उपरोक्त प्रमाणे संगणक प्रणाली मध्ये दुरुस्ती केले बाबतचा अहवाल आमचेकडे सादर करावा.

Rubal 9/7/21

रुबल अग्रवाल
अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)
पुणे महानगरपालिका

प्रति
१.मुख्य लेखा व वित्त अधिकारी
२.माहिती व तंत्रज्ञान अधिकारी
पुणे महानगरपालिका
३. सर्व खातेप्रमुख, पुणे महानगरपालिका
यांजकडे पुढील कार्यवाहीसाठी.....